**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**
जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,४९,
फोन न. २६४७ ४८ १२ फॅक्स न. २६४७ १६१९ ई मेल - jtdirrom@gmail.com

**परिपत्रक**

क्र.२/विकामुं/तंशि/आस्था-(४)/२०१५/1585
दिनांक :- 26 MAY 2015

प्रति,
संचालक / प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदाविका संस्था

विषयः- एम.ई./ एम.टेक./ पीएच.डी. हे उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी प्रतिनियुक्ती/ अध्ययन रजा मंजूरीसाठीची मा. संचालनालय स्तरावर धोरण निश्चिती...

संदर्भः-संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. यांचे परिपत्रक क्र. ४-४अ/आस्था/२०१५/९३, दि. १६.५.२०१५

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे वरिल संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करता एम.ई./ एम.टेक./ पीएच.डी. हे उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम पुर्ण करणेसाठी प्रतिनियुक्ती / अध्ययन रजा मंजुरीसाठीची संचालनालय स्तरावर धोरण निश्चिती करण्यात आलेली आहे. तद्नुषंगाने आपल्या संस्थेतील अध्यापकांचे उपरोक्त विषयाकिंत प्रस्ताव सादर करताना सदर परिपत्रकांतील सुचनाप्रमाणे प्रस्तावाची काटेकोरपणे छाननी करुन तद्नंतर या कार्यालयात सादर करण्यांत यावेत.

(प्रमोद अ. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,मुंबई

प्रतः- प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

Other letter new3

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२
E-mail : dte.desk4@gmail.com web : http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांक :- ४-४अ/आस्था/२०१५/९३
दिनांक :- 16 MAY 2015

विषय :- एम.ई./ एम.टेक./ पीएच.डी. हे उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी प्रतिनियुक्ती / अध्ययन रजा मंजूरीसाठीची संचालनालय स्तरावर धोरण निश्चिती ...

तंत्रशिक्षण संचालनालयांच्या अधिपत्याखालील विविध कार्यालये / शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये तसेच शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांमध्ये प्रशासकीय अथवा अध्यापक पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांकडून एम.ई./ एम.टेक./ पीएच.डी. हे उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी क्यूआयपी अंतर्गत प्रतिनियुक्ती मिळणेबाबतचे तसेच अध्ययन रजेचे प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येतात.

सदर उच्च शिक्षणाकरीता प्रतिनियुक्तीकरीता प्रस्तावांची छाननी करण्यासाठी संचालनालयांच्या स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली होती, सदर समितीने उच्च शिक्षणाकरीता प्रतिनियुक्तीसाठी शिफारशीकरीता यापूर्वी झालेल्या दोन बैठकांमधे खालीलप्रमाणे निकष निश्चित करुन प्रस्तावावर शिफारशी केलेल्या आहेत.

१. पीएचडी अभ्यासक्रमाकरीता परवानगीची कार्यवाही

पीएचडी अभ्याक्रमास प्रवेश घेण्यापूर्वी संचालनालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील तसेच ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घ्यावयाचा आहे. त्याच्या आधीच्या वर्षी ३० सप्टेंबर, पर्यंत प्रस्ताव सादर करुन संचालनालयाची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक असेल. दि.३० सप्टेंबर नंतर प्राप्त होणा-या प्रस्तावावर त्यावर्षी संचालनालयाकडून कार्यवाही केली जाणार नाही.

२. उच्च शिक्षणाकरीता अध्ययन रजा / प्रतिनियुक्तीसाठी शिफारस करावयाच्या जास्तीत जास्त संख्येची मर्यादा

पदवी अभ्यासक्रम

- प्रत्येक संस्थेतील प्रत्येक विद्याशाखेतील एक अध्यापक व राज्यातील सर्व संस्थांतील मिळून एकुण तीन अध्यापक
- ज्या विद्याशाखेतील अध्यापक यापूर्वी पीएचडी / एमई अभ्यासक्रमाकरीता प्रतिनियुक्त करण्यात आले आहेत ते सदर अभ्यासक्रम पूर्ण करुन परत आल्यानंतर त्या विद्याशाखेतील दुस-या अध्यापकांची प्रतिनियुक्ती करणे.
- प्रत्येक विद्याशाखेतील प्राप्त अध्यापकांचे अर्जाची छाननी संबंधित प्राचार्यांनी विद्याशाखेत उपलब्ध असलेल्या अध्यापकांच्या संख्येनुसार तसेच त्यांच्या ज्येष्ठतेनुसार करावी.

पदविका अभ्यासक्रम

- एका संस्थेतील सर्व विद्याशाखा मिळून अधिकतम एक अध्यापक व राज्यातील सर्व संस्थांतील एकूण तीन अध्यापक
- ज्या विद्याशाखेतील अध्यापक यापूर्वी पीएचडी /एमई अभ्यासक्रमाकरीता प्रतिनियुक्त करण्यात आले आहेत ते सदर अभ्यासक्रम पूर्ण करुन परत आल्यानंतर त्या विद्याशाखेतील दुसऱ्या अध्यापकांची प्रतिनियुक्त करणे
- प्रत्येक विद्याशाखेतील प्राप्त अध्यापकांचे अर्जाची छाननी संबधित प्राचार्यांनी विद्याशाखेत उपलब्ध असलेल्या अध्यापकांच्या संख्येनुसार तसेच त्यांच्या ज्येष्ठतेनुसार करावी.

३ अध्ययन रजा / प्रतिनियुक्तीचे निकष

- शासकीय सेवा किमान ५ वर्ष होणे आवश्यक.
- परिविक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण केलेला असावा.
- गोपनीय अहवालाची प्रतवारी ही "अ" (मागील ५ वर्षाची )
- अध्यापक बदली होऊन नव्याने संस्थेत कार्यरत असल्यास बदली झाल्यानंतर त्या संस्थेत किमान एक वर्ष कार्यरत असणे आवश्यक.
- पीएचडी / एम.ई. करीता प्रतिनियुक्त असल्यास त्या दरम्यान बदली प्रस्तावित करण्यात येऊ नये.
- पीएचडी अभ्यासक्रम कमाल ६ वर्षात पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा दिलेले सर्व फायदे वसूल करण्यात यावेत.
- पूर्णवेळ एम.ई/एम.टेक./पीएच.डी. साठी अपुरस्कृत उमेदवार म्हणून स्वखर्चाने प्रवेश घ्यावयाचा असल्यास अशा संस्थांमधील राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाची वेळ ही सायंकाळी ५.३० नंतर किंवा साप्ताहीक सुटीच्या दिवशी असावी आणि अशा प्रवेश घ्यावयाची संस्था व अध्यापकांच्या विद्यमान मुख्यालयातील अंतर ३० कि.मी.च्या मर्यादेत असावे.
- कार्यरत अध्यापकांना त्यांच्या संस्थेतील वावर (Access आणि Proximily चा विचार करता अध्यापक ज्या संस्थेत कार्यरत आहेत, त्याच संस्थेत 'पुरस्कृत' उमेदवार वगळता 'पुरस्कृत' उमेदवार संस्थेतून कार्यमुक्त होत असल्याची बाब गृहीत धरुन) अन्य प्रकरणी अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरीता परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यात येऊ नयेत.
- अभ्यासक्रम पूर्ण करण्यास परवानगी मिळणेबाबतचे प्रस्ताव संचालनालयास सादर करतांना प्रथमतः आय.आय.टी नंतर एन.आय.टी तद्नंतर राज्यशासनाचे विद्यापीठ / संस्था व तद्नंतर इतर संस्था हया प्राधान्यक्रमाने पुरस्कृत करण्यासाठी उमेदवारांचा प्राधान्यक्रम लावण्यात यावा.
- सामाजिक समन्वय राखण्याकरीता तसेच समान संधीचा दृष्टीकोन विचारात घेऊन उच्च शिक्षणाकरीता प्रतिनियुक्तीसाठी परवानगी देताना खुल्या व सामाजिक मागासवर्गीय (पात्र उमेदवारांचे अर्ज असल्यास) उमेदवारांचे प्रमाण प्रमाण ५० : ५० टक्के राखण्यात यावे.
- पीएच.डी.साठी पुरस्कृत उमेदवार म्हणून परवानगी देतांना पूर्वी गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ई/एम.टेक. इत्यादी) साठी फायदा घेतला असल्यास अशा उमेदवाराचा प्राधान्यक्रम ज्या उमेदवारांनी या योजनेअंतर्गत फायदा घेतलेला नाही त्यांचेनंतर असावा.
- उच्च शिक्षणासाठी पुरस्कृत करताना उमेदवाराचे वय ५० पेक्षा (पूर्वीच्या सेवानिवृत्तीच्या वयात ५८ ऐवजी ६० असा बदल विचारात घेता) जास्त नसावे. (वयाच्या ५४ व्या वर्षापर्यंत उच्च शिक्षण पूर्ण करुन संस्थेत

रुजू होणे आवश्यक) जेणेकरुन प्रतिनियुक्तीवरुन परत आल्यानंतर ६ वर्षे सेवेच्या अनिवार्य अटीची पूर्तता करणे शक्य होईल.

- स्वखर्चाने अर्धवेळ उच्च शिक्षणासाठी प्रवेश घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल मात्र अशा संस्था अध्यापकांच्या विद्यमान मूख्यालयापासून ६० कि.मी. अंतराच्या मर्यादेत असाव्यात.

सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांप्रमूखांच्या निदर्शनास सदर धोरण / निकष आणून द्यावेत. संस्थाप्रमूखांनी, पीएच.डी./ एम.ई सांठी प्रतिनियुक्ती / अध्ययन रजा यासाठी प्रवेच्छूक अध्यापकांच्या निदर्शनास सदर धोरण आणून द्यावे. सदर निकष / धोरण विचारात घेऊन यापुढे प्रस्तावांची छाननी करण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर परिपत्रकाची प्रत ही संचालनालयाच्या संकेतस्थळावर डाऊनलोड विभागातून उपलब्ध करुन घेण्यात यावी.

(दयानंद मेश्राम)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता :-
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
२. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
२. सर्व प्राचार्य, शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.